ISSN 2278-3954 Saptahik Nagara

# साप्ताहिक नगारा

संस्थापक संपादक : दलितमित्र स्व. गोविंदराव गोरवाडकर

R.N.I. No. 16746/67 पोष्टाचा परवाना क्र. एम.जी.एन.३९/२०१८-२०२०

श्री. ____________________

पत्ता ____________________

वरील पत्त्यावर अंक न पोहोचल्यास परत पाठविण्याचा पत्ता : मा. संपादक सा. नगारा, ८५२, गोरवाडकर वाडा, मालेगांव कॅम्प (नाशिक)

## NAGARA WEEKLY

* मंगळवार दि. २२ ऑक्टोबर २०१९





# फसलेली शिकवणी

।। मुक्तक ।।

प्रा.सुरेश भिलकोटकर

मो. : ९४२१६०९४३७

(लेखक मुक्त विद्यापीठात प्राध्यापक आहेत.)

काही माणसे अतिशय साधी असतात. त्यांच्या मनात आणि व्यक्तिमत्त्वात गुंता आणि गाठी नसतात. दैनंदिन जीवनातील काही साधे प्रश्न सोडवितानाही त्यांना त्रास होतो. आमचा मित्र खंडू असाच. अगदी साधा सरळ. वडील महादुबाबा कष्टाळू शेतकरी. आयुष्यभर कष्ट उपसणाऱ्या महादूबाबालाही व्यवहारी जगातील छक्के-पंजे माहीत नव्हते.

खंडू अशाच संस्कारात वाढलेला. शेतातल्या कामांमध्ये तो तरबेज होता. शाळेत मात्र खंडूची गाडी म्हणजे ढकलगाडीच होती.. पाचवीत त्याची गाडी चांगलीच रुतली. म्हणून त्याला पाचवीतच शाळेला रामराम ठोकावा लागला. महादूबाबाला बरेच झाले. खंडू शेतीसोबतच गुरेढोरे आवडीने आणि लीलया हाताळायचा. एक बऱ्यापैकी मुलगी पाहून फारसा गाजावाजा न करता महादूबाबाने खंडूचे दोनाचे चार हात केले. सरळ स्वभावाचा खंडू काहीसा बुजराही होता. आयुष्यासाठी मिळालेली जोडीदारीणही शाळेची पायरी चढलेली नव्हती.

गावात रात्रीच्या जेवणानंतर मित्रांनी एकत्र जमणे.. गप्पा मारणे.. सामान्य गोष्टी होत्या.. दहा-बारा मित्रांच्या चमूतील एक-दोघांची नुकतीच लग्ने झालेली होती. काहीजण एक-दोन पोरांचे बाप झालेले होते. खंडूचे लग्न होऊन दोन-तीन महिने झाले होते. पण अलिकडे सवंगड्यांमध्ये तो नेहमीसारखा नॉर्मल नसे. काहीतरी चिंता त्याला ग्रासलेली असायची. नव्याने लग्ने झालेल्या उमेदवाराची तशी चमूत वारंवार विकेट घेतली जात असे. तशी खंडूचीही गंमत केली जाई. तो दुर्लक्ष करीत असे. परंतु त्याची प्रतिक्रिया पुढे मित्रांमध्ये काळजीचा विषय झाला. एके दिवशी संभा मास्तरच्या पक्याने चमूत पुडी सोडली की, 'खंडूचे लग्न झाले खरे.. पण त्याचा नि बायकोचा टाळा बसत नाही..' ही सर्व बातमी हा.. हा.. म्हणता सर्व मित्रांपर्यंत पोचली.

दररोज एकत्र जमणाऱ्या मित्रांमध्ये जमादू काहीसा समजदार आणि परिपक्व होता. जमादूने खंडूला बाजूला घेतले. खंडूची समस्या त्याने समजून घेतली. खंडू आणि त्याच्या पत्नीला एकत्र यायला संधी मिळत नव्हती, ही खंडूची समस्या होती. घरातील काहीजण घराच्या ओसरीत आणि काहीजण अंगणात झोपलेले असायचे.. अर्थातच खंडूची बायकोही घरातील इतर बायकांसोबत झोपलेली असायची.. रात्रीचा अंधार असल्यामुळे ती नेमकी कोठे झोपली हे त्याला कळेनासे होई.. अनेक दिवस सातत्याने असेच चालू राहिल्याने त्याच्या दैनंदिन वागण्यावर परिणाम आता होऊ लागला होता. संध्याकाळी मित्रांत गप्पा मारतानाही तो पूर्वीचा खंडू दिसत नसे. त्याला मार्गदर्शन करण्याची जबाबदारी जमादूवर सोपविण्यात आली. जमादूने त्याला काही कानगोष्टी दिल्या.

खंडू दिवसभर कामानिमित्त बाहेर असे. तो संध्याकाळी घरात असतांना बायको कामात असायची. घर जुन्या विचारांचे असल्याने जुनी जोडपीही मर्यादितच जोडीदाराशी संवाद साधत. बुजरा खंडू आणि अबोल बायको यामुळे दोघांचा संवाद होत नसे. तो रात्री मित्रमंडळीमधून घरी गेल्यावर घरातील सर्व सदस्यांसारखी बायकोही डाराडूर झोपलेली असे. तिला उठवावे कसे? हा खंडूपुढील यक्षप्रश्न होता. त्यावर जमादूने सांगितले,

'हे बघ खंडू.. तू उशिरा घरी जाशील.. आधी घराचे दार उघड.. घरात जाऊन पाणी घे.. गुळणी करण्यासाठी चूळ भरुन बाहेर ये.. झोपलेल्या बायकोच्या तोंडावर पाण्याची बारीक चूळ फेक.. ती जागी होईन ..!'

'पण ती घाबरुन ओरडली तर..?' खंडूने भीती प्रकट केली. जमादूने धीर दिला. न घाबरता पुढे जाण्याच्या सल्ला दिला. कसाबसा खंडू तयार झाला. त्या दिवशी तो बराच उशिरापर्यंत जमादूसोबत होता. सर्वांतर्फे धीराचा सल्ला देऊन त्याला घरी पाठविण्यात आले. मित्रमंडळी त्याला मनोमन शुभेच्छा देत थांबलेली होती. खंडूचे घर पारापासून जवळच होते. उशीर झाला म्हणून सर्वजण निघण्याच्या तयारीत असताना खंडू धावतच आला. धापा टाकत मित्रांसमोर उभा राहिला. तो पुरता कावराबावरा आणि निराश झाला होता. झाले असे होते,

जमादूने प्रशिक्षण दिल्यावर खंडू घरी गेला.. घरातील मंडळी झोपली होती. अंधारातून वाट काढीत खंडू दाराजवळ पोचला.. दाराची कडी उघडताना बायको कोठे झोपली, याचा अंदाज घेतला.. घरात गेला.. इच्छा नसतानाही पाणी प्याला.. पाण्याचा तांब्या घेऊन चूळ भरीत ओसरीत आला.. अंधार किर्र होता.. तो हळूच ओसरीतील पूर्वेकडच्या कोपऱ्याकडे सरकला आणि अचूक नेम धरीत तोंडातील पाण्याची गुळणी जोरात फेकली.. तसा,

'तुनीऽऽ आयना बेरडऽऽऽ कोण खंड्या..कारेऽऽऽ.. तुन्हा काय डोळा फुटी गयात कारे..?' महादूबाबाचा घनगंभीर आवाज ओसरीत.. परिसरात घुमला..

व्हायला नको ते झाले.. बायकोला उठविण्याच्या नादात खंडूने बापाच्याच तोंडावर पाण्याची गुळणी मारली होती.. महादूबाबा बडबडत होता.. खंडू ओशाळला होता.. घरातील मंडळी आणि बायकोची प्रतिक्रिया उमटण्याच्या आधी तो सटकला.. मित्रांच्या आश्रयाला आला.. काय झाले म्हणून विचारणाऱ्या मित्रांना त्याला काही सांगता येत नव्हते.. तो केवळ धापा टाकत होता. मित्राला मदत करण्याचा जमादूसह सर्वांचा बेत फिस्कटला होता. खंडूला मित्रांनी दिलेली शिकवणी फसली होती!

अरविंद आईस्क्रीम

* व्हॅनिला * स्ट्रॉबेरी * पायनापल
आदी स्वादांमध्ये आईस्क्रीम

* लग्न समारंभाच्या ऑर्डर स्विकारल्या जातील.
* कोल्ड्रींक्स दुकानदारांसाठी होलसेल भावात आईस्क्रीम

मुख्य शाखा : अरविंद आईस्क्रीम, बोरसे नगर, प्लॉट नं. २८, सटाणा नाका, मालेगांव
शाखा : आशिर्वाद स्वीटस् ॲण्ड कोल्ड्रींक्स्, कापसे गल्ली, मालेगांव (नाशिक)
मोबाईल : 9822186585